N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0156 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/02/2026 06:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/02/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/02/2026

**Time From (वेळेपासून):** 14:59 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/02/2026 **Time (वेळ):** 06:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 012

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/02/2026 06:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** संगमनेर शहरातील क्रिडा संकुलास

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अजित बाळकष्ण त्रिपुटे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रत,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रत,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329701344

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबासाहेब गंगाधर वा-हाडे | | | 1. आश्वी बुद्रुक, तासंगमनेर, रा, संगमनेर शहर ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | हितेश सोमनाथ घोडेकर | | | 1. राजापुर रोड, ढोलेवाडी, तासंगम,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | प्रतिक विजयकुमार कातोरे | | | 1. रा सांगवी, पोस्ट कळस बुद्रुक,, संगमनेर शहर ,अहिल्यानगर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 12 नोटा | 6,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद 18/02/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे , व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दि.16/02/2026 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना तक्रारदार धनंजय सुनिल तांबे यांनी आमचेशी संपर्क करून त्यांची लोकसेवकाविरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व ते लोकसेवक यांस दि. 17/02/2026 रोजी तहसिल कार्यालय, संगमनेर येथे भेटणार असल्याचे कळविले. आम्ही त्यांना दि. 17/02/2026 रोजी संगमनेर येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या. आम्ही तालुका कृषी अधिकरी, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेवुन त्यांना दि. 17/02/2026 रोजी सकाळी 10/00 वा. ला.प्र.वि. कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना दिल्या.

दि.17/02/2026 रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकॉं शिंदे, पोकॉं निमसे, पोकॉं कराड, चापोहेकॉं हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 10/30 वा. निघुन 13/00 वा. दरम्यान संगमनेर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेथे तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम एच 17 एडब्ल्यु 6585 सह हजर होते.

आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. धनंजय सुनिल तांबे, वय 18 वर्षे, धंदा शिक्षण, रा. चिंचपुर बुद्रुक, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, " मी वरील ठिकाणचा रहिवासी असुन माझे कुटुंबात माझे वडिल, आई, बहिण स्नेहल व निकीता असे सदस्य आहेत. मी मागील वर्षी इयत्ता 12 वी कॅम्प्युटर सायन्स चे शिक्षण पुर्ण केले आहे. जुन 2025 मध्ये मी कुणबी जातीचे प्रमाणपत्र काढण्याकरीता लागणा-या कागदपत्रांची चौकशी करण्याकरीता

तहसिल कार्यालय, संगमनेर येथे गेलो असता तेथे श्री. बाबासाहेब बो-हाडे, तलाठी आश्वी बु हे भेटले व त्यांनी मला
माझे कामाबाबत विचारले असता मी त्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र काढायचे आहे असे सांगितले. त्यावेळी त्यांनी
मला त्यांची तहसिल कार्यालयात व प्रांत कार्यालयात चांगली ओळख असल्याचे सांगुन, '' मी तुझा कुणबी जातीचा
दाखला व कास्ट व्हॅलिडीटी माझी ओळख वापरून काढुन देतो त्याकरीता तु कुणबी जातीचा दाखला
काढण्याकरीता 6000/-रुपये व कास्ट व्हॅलिडीटी करीता 7000/-रुपये असे एकुण 13,000/-रुपये मला दे''
असे म्हणुन माझेकडे पैशांची मागणी केली. मी त्यांना माझे शैक्षणिक कागदपत्रे दिली. त्यावेळी त्यांनी मला 13,000
/-रुपये लगेच लागतील असे सांगितले असता मी त्यांना त्यावेळी 13,000/-रुपये दिले. त्यानंतर त्यांनी मला दि.
09/07/2025 रोजी कुणबी जातीचा दाखला दिला व माझे कास्ट व्हॅलिडीटीकरीता ऑनलाईन अँप्लीकेषन
त्यांनीच भरून कास्ट व्हॅलिडीटी ईमेलव्दारे येईल असे सांगितले. त्यानंतर दि. 19/09/2025 रोजी माझी कास्ट
व्हॅलिडीटी मला ईमेलव्दारे प्राप्त झाली. मी तलाठी बो-हाडे यांना कास्ट व्हॅलिडीटी मिळाली असे सांगितले, त्यावेळी
त्यांनी घरातील आणखी कोणाचा दाखला व कास्ट व्हॅलिडीटी काढायची असेल तर सांग असे मला म्हणाले. मी
त्यांना मोठया बहीणीचा कुणबी जातीचा दाखला काढायचा आहे असे सांगितले. मी नंतर चौकशी केली असता कुणबी
जातीचा दाखला काढण्याकरीता व कास्ट व्हॅलिडीटीकरीता 13,000/-रुपये एवढी मोठी रक्कम लागत नसल्याचे
मला समजले. तसेच तलाठी बो-हाडे यांनी माझेकडुन 13,000/-रुपये लाच स्विकारल्याचे माझे लक्षात आले. दि.
16/02/2026 रोजी तलाठी बो-हाडे यांचा मला फोन आला व त्यांनी मला बहीणीचा कुणबी दाखला काढायचा
असेल तर तिचे षैक्षणिक कागदपत्रे व कुणबी दाखला काढण्याकरीता 6000/-रुपये व त्यानंतर कास्ट
व्हॅलिडीटीकरीता 7,000/-रु. असे एकुण 13,000/-रुपये घेवुन दि. 17/02/2026 रोजी संगमनेर तहसिल
कार्यालय येथे येणेबाबत सांगितले. मी यापुर्वी तलाठी बो-हाडे यांना माझा दाखला व व्हॅलिडीटी काढण्याकरीता
नाईलाजाने पैसे दिले होते. परंतु आता मला तलाठी बो-हाडे यांना लाच देण्याची ईच्छा नाही.
आज दि. 17/02/2026 रोजी मी तलाठी बो-हाडे यांची भेट घेणार आहे व माझे बहीणीचा कुणबी जातीचा दाखला
व कास्ट व्हॅलिडीटी संबंधाने बोलणी करणार आहे. त्यावेळी तलाठी बो-हाडे यांनी त्यांची तहसिल कार्यालयात व
प्रांत कार्यालयात ओळख असल्याचे सांगुन कुणबी जातीचा दाखला व कास्ट व्हॅलिडीटी काढण्याकरीता माझेकडे
लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. माझ्यात व तलाठी बो-हाडे यांचेत कोणत्याही प्रकारचा
आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. तलाठी बो-हाडे यांनी लाचेची मागणी
केल्यास सदरची रक्कम मी माझ्या कुटुंबाच्या बचतीतुन हजर करील. आता मी माझे कुणबी जातीचा दाखला व
कास्ट व्हॅलिडीटीची छायांकित प्रत हजर करत आहे..'' अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे
स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार तांबे यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक बो-हाडे, तलाठी यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे
ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळविले.
आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाईस
रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली.
त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. तांबे यांनी दिलेल्या तक्रारीची
पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. तांबे असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले.
त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना
समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते तक्रारदार श्री. तांबे यांचे गळ्यात कोणास
दिसणार नाही अशा प्रकारे अडकवुन दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार
तांबे यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेवक बो-हाडे यांची भेट घेण्याकरीता तहसिल कार्यालय, संगमनेर येथे
जाण्याकरीता 14/59 वाजता रवाना केले. त्यानंतर 15/34 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. 1 आम्ही
थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ निमसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले.
आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक बो-हाडे यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या
घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन तहसिल
कार्यालयाजवळ पोहोचलो. तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून एका इसमास फोन करून कुठे आहे असे
विचारता त्यांनी सहयाद्री जवळ, नेहरू गार्डन जवळ येण्यास सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार असे सहयाद्री
मल्टीसर्विसेस या दुकानाजवळ गेलो. तक्रारदार यांनी समोरच दुचाकी वाहन उभे करून तक्रारदार हे सिनारे
टाईपरायटर या दुकानात गेले. त्यांचेपाठोपाठ मी गेलो. तेथील एका इसमाने तक्रारदार यांना माझेबाबत विचारले
असता तक्रारदार यांनी चुलत भाऊ असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी सदर इसमास निकिता तांबेचे सर्टिफिकेट
काढायचे आहे असे विचारले असता सदर इसमाने तिचे आधारकार्ड लागेल असे सांगितले. त्यावेळी सदर इसम हे

लोकसेवक बो-हाडे असल्याचे मला समजले. तक्रारदार व लोकसेवक बो-हाडे यांचेत तक्रारदार यांच्या बहीणीच्या कुणबी जातीच्या प्रमाणपत्राबाबत व कास्ट व्हॅलिडीटीबाबत चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान लोकसेवक बो-हाडे यांनी दाखल्याच्या चार स्टेज असतात, नायब तहसिलदार, तहसिलदार, प्रांत ऑफिसचे षिरस्तेदार, आणि प्रांत ऑफिस असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक बो-हाडे यांनी तक्रारदार यांना पेमेंट दे, असे म्हणाले असता तक्रारदार यांनी किती दयायचे असे विचारले, त्यावर लोकसेवक बो-हाडे यांनी अगोदर जे घेतले तेवढे दे, तुझे दाखले काढले, तुझी पडताळणी केली ते तुला माहिती आहे ना असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी सहा हजार का असे विचारले असता लोकसेवक बो-हाडे यांनी सहा दाखल्याचे व पुढील फाईलचे सात असे एकुण तेरा लागतील, माझ्या कामाची क्वालीटी असते, अचुकता असते आणि हेलपाटे मारावे लागत नाहीत असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली व येताना बहीणीचे आधारकार्ड आणण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी आता 6,000/- रूपये देतो, आधार कार्ड आणि पेमेंट घेवुन येतो असे म्हणाले असता बो-हाडे यांनी घेवुन ये असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विषयी विचारले असता त्यांनी पंच नं. 1 यांनी सांगितलेल्या हकिगतीषी मिळती जुळती हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हाईस रेकॉर्डर मधील तक्रारदार व लोकसेवक बो-हाडे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक बो-हाडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या बहीणीचा कुणबी जातीचा दाखला काढण्याकरीता 6,000/-रु आणि त्यानंतर कास्ट व्हॅलिडीटीकरीता 7,000/-रु. असे एकुण 13,000/-रुपये लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला टप्पा म्हणुन कुणबी जातीचा दाखला काढण्याकरीताचे 6,000/-रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निश्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 6000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 12 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोहेकॉ शिंदे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवष्यकत्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी क्रिडा संकुलचे समोर, सिनारे टाईपरायटर सेंटर येथे जावुन लोकसेवक बो-हाडे यांची भेट घ्यावी. बो-हाडे यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम त्यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा इषारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या.. पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक बो-हाडे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने 16/22 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन क्रिडा संकुलचे समोर, सिनारे टाईपरायटर सेंटरचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 असे वाहनावरून उतरुन सिनारे टाईपरायटर सेंटरमध्ये गेले. थोडयावेळाने तक्रारदार यांचे सोबत एक इसम बाहेर आले. तक्रारदार सदर इसमाच्या दुचाकीवर बसुन तेथुन निघुन गेले व थोडयाच वेळात तक्रारदार व सदर इसम त्यांचेकडील मोटारसायकलवरून परत सिनारे टाईपरायटर सेंटर येथे आले. तक्रारदार यांनी त्यांना ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इषारा 16/40 वा. दरम्यान केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन तक्रारदार यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी समोरील इसमाकडे बोट दाखवुन सांगितले की, हे तलाठी बो-हाडे आहेत, त्यांनी मला त्यांचे दुचाकीवर बसवुन अकोले नाका, संगमनेर येथील जय हिंद मेडिकल येथे नेवुन सदर मेडिकलमधिल एका इसमाकडे लाचेची रक्कम देण्यास सांगितल्याने मी सदरची रक्कम मेडिकलमधिल इसमाकडे दिली आहे, असे सांगितले. त्यानंतर आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बाबासाहेब गंगाधर बो-हाडे, वय 57 वर्षे, तलाठी, आश्वी बु, ता.संगमनेर, रा. वडगाव लांडगा, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक बो-हाडे यांना शासकिय वाहनात सोबत घेवुन सापळा पथकासह शासकिय वाहनाने जय हिंद मेडिकल, अकोले नाका येथे गेलो. पाठोपाठ तक्रारदार यांना येण्याबाबत कळविल्याप्रमाणे तक्रारदार तेथे आले. आम्ही सर्वजण वाहनातुन उतरून जय हिंद मेडिकलमध्ये गेलो. आम्ही तक्रारदार यांना दोन पंचासमक्ष लाचेची रक्कम मेडिकलमध्ये कोणाकडे दिली असे विचारले असता तक्रारदार यांनी समोर उभ्या असलेल्या इसमाकडे बोट करून यांचेकडे लाचेची रक्कम लोकसेवक बो-हाडे यांचे सांगण्यावरून दिली असल्याचे व त्यांनी सदरची रक्कम मोजुन घेतली असल्याचे सांगितले. आम्ही सदर इसमास आमची ओळख सांगुन त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव हितेश सोमनाथ घोडेकर, वय 28 वर्षे, धंदा मेडिकल स्टोअर्स,

रा. राजापुर रोड, ढोलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन रक्कम रूपये 6,000/- घेवुन सदरची रक्कम एका पांढÚया रंगाच्या गोळ्या ठेवण्याच्या पाकिटात ठेवुन त्यावर बो-हाडे मामा असे लिहुन ते पाकिट त्यांचे मेडिकल पार्टनर व लोकसेवक बो-हाडे यांचे भाचे प्रतिक कातोरे यांचेकडे दिले असल्याचे सांगितले. आम्ही प्रतिक कातोरे यांना त्यांचे पुर्ण नाव लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव प्रतिक विजयकुमार कातोरे, वय 26 वर्षे, धंदा मेडिकल स्टोअर, रा. सांगवी, पोस्ट कळस बुद्रुक, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर असे सांगुन त्यांनी हितेष घोडेकर यांनी दिलेले नोटांचे पाकिट त्यांचे पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवले असल्याचे सांगितले. सदरचे पाकिट आम्ही पंच नं. 2 यांचेकरवी ताब्यात घेवुन त्यामध्ये लाचेच्या नोटा असल्याची खात्री केली. त्यानंतर आम्ही खाजगी इसम हितेष घोडेकर व प्रतिक कातोरे यांना ताब्यात घेवुन लोकसेवक बो-हाडे यांचेसह पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्याकरीता षासकिय विश्रामगृह, संगमनेर येथे आलो. पाठोपाठ तक्रारदार षासकिय विश्रामगृह येथे आले. तेथे आम्ही एक कक्ष उपलब्ध करून घेवुन त्या कक्षात लोकसेवक बो-हाडे, खाजगी इसम घोडेकर, खाजगी इसम कातोरे यांच्या हातांची व कपडयांची अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात तपासणी केली असता, खाजगी इसम घोडेकर यांच्या दोन्ही हातांच्या तळहातास व बोटांच्या पे-यांना अँन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. खाजगी इसम कातोरे यांच्या डाव्या हाताच्या बोटांच्या पे-यांना व त्यांचे अंगातील नेसते पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशाच्या आतील बाजुस व तोंडास अँन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटोग्राफस् घेण्यात आले. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण ऐकले. त्यानंतर शासकिय विश्रामगृह, संगमनेर येथे पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले. तरी दिनांक 17/02/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 14/59 ते 15/34 वाजेच्या दरम्यान संगमनेर शहरातील क्रिडा संकुलासमोरील सिनारे टाईपरायटर या दुकानात लोकसेवक बो-हाडे, तलाठी यांनी तक्रारदार श्री. तांबे यांना त्यांची तहसिल कार्यालयात व प्रांत कार्यालयात ओळख असल्याचे दाखवुन तांबे यांचेकडे त्यांच्या बहीणीचा कुणबी जातीचा दाखला काढण्याकरीता 6,000/-रुपये व कास्ट व्हॅलिडीटी काढण्याकरीता 7,000/-रु असे एकुण 13,000/-रुपये लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला टप्पा म्हणुन कुणबी जातीचा दाखला काढण्याकरीताचे 6,000/-रुपये स्विकारण्याची तयारी दर्शवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केल्याने व 16/22 ते 16/40 वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक बो-हाडे यांचे सांगण्यावरून खाजगी इसम हितेश घोडेकर यांनी तक्रारदार यांचेकडुन 6,000/-रु. लाचेची रक्कम स्विकारून सदरची रक्कम एका पांढ-या रंगाच्या, गोळ्या ठेवण्याच्या पाकिटात ठेवुन ते पाकिट त्यांचे मेडिकल पार्टनर व लोकसेवक बो-हाडे यांचे भाचे प्रतिक कातोरे यांचेकडे देवुन लाच रक्कम स्विकारण्यास लोकसेवक बो-हाडे यांना मदत केली.तसेच खाजगी इसम प्रतिक कातोरे यांनी लाचेच्या नोटा असलेले पाकिट त्यांचे पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषात ठेवुन लाच रक्कम स्विकारण्यास लोकसेवक बोÚहाडे यांना मदत केली म्हणुन यातील 1) लोकसेवक बाबासाहेब गंगाधर बो-हाडे, वय 57 वर्षे, तलाठी, आश्वी बुद्रुक, ता.संगमनेर, रा. वडगाव लांडगा, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर, वर्ग-3, 2) खाजगी इसम हितेश सोमनाथ घोडेकर, वय 28 वर्षे, धंदा मेडिकल स्टोअर्स, रा. राजापुर रोड, ढोलेवाडी, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर, 3) खाजगी इसम प्रतिक विजयकुमार कातोरे, वय 26 वर्षे, धंदा मेडिकल स्टोअर, रा. सांगवी, पोस्ट कळस बुद्रुक, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

( अजित त्रिपुटे )
पोलीस उप अधीक्षक

अँन्टी करप्षन ब्युरो,अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sameer navnath baravkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ. ए. सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठविण्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sameer navnath bar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**